प्रोप्रा.गायसमुद्रे 9527407701 8459953702
SM
एस.एम गारमेंट
शर्ट-पॅन्टचा कारखाना
पॅन्ट-शर्ट | अरमानी | शेरवानी | सफारी
आमच्याकडे सर्व प्रकारचे ड्रेस एक तासात शिवून मिळतील
बीड रोड, न्यायालया समोर केज जि.बीड
प्रोप्रा.गायसमुद्रे मो.न.9527407701 8459953702
एक वेळ अवश्य भेट द्या



# दैनिक वादळ वार्ता

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com



गाव तेथे वार्ताहर
महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात
वार्ताहर/पत्रकार आणि जाहिरातदार नेमणे आहेत.
वादळ वार्ता
या लोकप्रिय दैनिक वृत्तपत्राकरिता महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात प्रतिनिधी नेमणे आहेत. इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा.
जॉईन झालेल्या प्रत्येक प्रतिनिधींना आय कार्ड आणि नियुक्ती पत्र दिले जाईल.
* पात्रता *
समाजसेवेची आवड, जनसंपर्क, फोन असणे आवश्यक, सोशल मीडियाचा वापर करता येणे
दैनिक वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे एकमेव विभागीय निर्भिड दैनिक
मो.न.9422660077



●मुख्य संपादक : अजय भांगे ●कार्यकारी संपादक : रमेश गुळभिले https://epaper.vadalvarta.com मो.न. ९४२२६६००७७

● बीड/महाराष्ट्र ● शनिवार ३ ऑगस्ट २०२४ ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष १ ले ● अंक ३५२ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये


# चिल्लर लोकांच्या नको, महाराष्ट्रातील ४ नेत्याच्या गाड्या फोडा-प्रकाश आंबेडकर

## गाड्या फोडाफोडीच्या नेमक्या काय घटना घडल्या?

**महाराष्ट्रात गेल्या दोन दिवसांत दोन नेत्यांच्या गाड्या फोडल्याच्या घटना घडल्या. माजी खासदार संभाजीराजे छत्रपती यांच्या स्वराज्य संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी काल राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांच्या गाडीची तोडफोड केली. या घटनेमुळे महाराष्ट्रातील वातावरण तापलं होतं. जितेंद्र आव्हाड यांनी संभाजीराजे छत्रपती यांच्यावर टीका केली होती. या टीकेचा राग मनात धरुन संभाजीराजे छत्रपती यांच्या समर्थकांनी काल जितेंद्र आव्हाड यांची गाडी फोडली. जितेंद्र आव्हाड यांची गाडी फोडण्याआधी तशीच घटना एक दिवस आधी अकोल्यात घडली होती. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे आमदार अमोल मिटकरी यांची अकोल्यात मनसे कार्यकर्त्यांनी गाडी फोडली होती. अमोल मिटकरी यांनी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्यावर टीका करताना सुपारीबाज असं वक्तव्य केलं होतं. त्यांची ही टीका मनसे कार्यकर्त्यांच्या जिव्हारी लागली होती. त्यामुळे मनसे कार्यकर्त्यांनी संतापात अमोल मिटकरी यांची अकोल्यात गाडीची तोडफोड केली होती**



**वादळवार्ता/मुंबई**

महाराष्ट्राच्या राजकारणात आतापर्यंत पक्षीय फोडाफोडीचं राजकारण बघायला मिळालं होतं. पण आता रस्त्यांवर फोडाफोडी बघायला मिळत आहे. आगामी विधानसभा निवडणुकीच्या आधी महाराष्ट्रातील राजकीय वातावरण तापताना दिसत आहे. विशेष म्हणजे दोन दिवसांत रस्त्यांवर राजकीय फोडाफोडीच्या दोन घटना घडताना दिसल्या आहेत. या घटनांवर सर्वसामान्य नागरिक म्हणून कसं व्यक्त व्हावं? असा प्रश्न अनेकांना पडला आहे. महाराष्ट्राची एक राजकीय संस्कृती राहिलेली आहे. महाराष्ट्राच्या राजकीय संस्कृतीची विस्तृत अशी परंपरा राहिलेली आहे. महाराष्ट्राच्या राजकारणाचा मानमर्यादांचा एक विस्तृत असा इतिहास आहे. पण आता अतिशय द्वेषाचं राजकारण बघायला मिळत आहे. हे द्वेषाचं राजकारण आता रस्त्यावरच्या लढाईपर्यंत येऊन पोहोचलं आहे. त्यामुळे गेल्या दोन दिवसांत दोन नेत्यांच्या दोन वेगवेगळ्या प्रकरणांमुळे गाड्या फोडण्याच्या घटना समोर आल्या आहेत. या घटनांवर आता वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी मिश्किल शैलीत भाष्य केलं आहे. त्यांनी गाड्यांची तोडफोड करणाऱ्या कार्यकर्त्यांना महाराष्ट्रातील ४ मोठे आणि ताकदवान नेत्यांच्या गाड्या फोडण्याचं आवाहन केलं आहे. यासाठी प्रकाश आंबेडकर यांनी थेट ४ नेत्यांची नावेदेखील घेतली आहेत.

प्रकाश आंबेडकर नेमकं काय म्हणाले?

“आता मिटकरी कुठल्या पक्षात आहेत? अजित पवार गटात आहे. जितेंद्र आव्हाड कोणत्या गटात आहेत? शरद पवार गटात आहेत. गाड्या फोडणाऱ्यांना माझं आवाहन आहे, अरे चिल्लर लोकांच्या का गाड्या फोडत आहात? या चिल्लर लोकांच्या गाड्या फोडून काहीच होणार नाही. तुम्हाला गाड्या फोडायच्या असतील तर चार माणसांची नावे देतो, त्यांच्या गाड्या फोडा. एक माजी केंद्रीय मंत्री शरद पवार, दुसरं नाव उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, तिसरं नाव ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि चौथं नाव मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, या नेत्यांच्या गाड्या फोडा. या चिल्लरफाल्लरांच्या काय गाड्या फोडता?”, असं प्रकाश आंबेडकर म्हणाले.



## चौसाळा येथे लोकशाहीर डॉ.आण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहात साजरी

**बीड /प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील चौसाळा येथील राजर्षी शाहु नगर याठिकाणी लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांची जयंती मोठया उत्साहात साजरी करण्यात आली प्रथमता भाजपा अनुसुचित जाती मोर्चाचे बीड तालुका अध्यक्ष पवन कुचेकर यांच्या शुभहस्ते लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. प्रभावी लेखणीतुन ,अनमोल वाणीतुन वंचितांच्या व्यथा प्रखरपणे मांडणारे ,साहित्यीक ,लेखक, समाजसुधारक,संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील बुलंद आवाज लोकशाहीर साहीत्यसम्राट डॉ.आण्णाभाऊ साठे यांची जयंती शाहु नगर चौसाळा येथे अभिवादन सभा घेऊन साजरी करण्यात आली. यावेळी जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष कपिल मस्के, उपाध्यक्ष रवी सोनवणे,सचिव लखन सोनवणे, चौसाळा पत्रकार संघाचे अध्यक्ष विवेक कुचेकर, एकता ग्रुपचे अध्यक्ष स्वपनील सोनवणे, शाहेद पठाण,वैभव सोनवणे,वायभट सर,करण परदेशी,शंकर सोनवणे,राहुल वाघमारे,जितीन काळे,सतिष रूपवते,प्रदीप कुलकर्णी,प्रकाश ढोकणे,नितीन काळे,सतिष वाघमारे,किशोर कुचेकर,दादा गायकवाड यांच्यासह समाज बांधव मोठया संख्येने उपस्थीत होते.

## खांडे पारगाव केंद्राचे केंद्रप्रमुख शिवाजी भोंडवे यांचा सेवापूर्ती गौरव सोहळा संपन्न

**बीड, प्रतिनिधी-**

जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा खांडे पारगाव केंद्राचे केंद्रप्रमुख शिवाजी भोंडवे हे नियत वयोमानानुसार नुकतेच सेवानिवृत्त झाले. त्याबद्दल बीड शहरातील पवनसुत मंगल कार्यालयात सेवापूर्ती गौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बीड पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी भगवान सोनवणे हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून अजय बहिर , जमीर शेख, प्रणिता गंगाखेडकर, मधुकर तोडकर, तुकाराम जाधव, सिद्धेश्वर माटे, समंदर खान, व तालुक्यातील सर्व केंद्रप्रमुख मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले.




त्यानंतर सर्व प्रमुख मान्यवरांच्या हस्ते शिवाजी भोंडवे यांचा सेवापूर्ती निमित्त गौरव करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे प्रस्ताविक खांडे पारगाव केंद्राचे केंद्रीय मुख्याध्यापक जलील शेख यांनी केले. त्यांनी शिवाजी भोंडवे यांच्या विषयी आपले मनोगत व्यक्त केले. त्यानंतर खांडे पारगाव केंद्रातील शिक्षक महादेव घोडके, सुमन जोगदंड, सुचिता गवते, निर्मला वाघमारे, आदि शिक्षकांनी शिवाजी भोंडवे यांच्या विषयी चे मत व्यक्त केले. त्यानंतर प्रमुख मान्यवरांपैकी अजय बहीर ,जमीर शेख, यांनी केंद्रप्रमुख शिवाजी भोंडवे यांच्या विषयीचे मत व्यक्त करताना त्यांच्या कार्याबद्दल त्यांचे विशेष असे कौतुक केले. व पुढील वाटचालीसाठी त्यांना शुभेच्छा दिल्या. त्यानंतर केंद्रप्रमुख शिवाजी भोंडवे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. मनोगत व्यक्त करताना ते अतिशय भावुक झाले. 39 वर्षाच्या सेवेत त्यांनी अनेक चढउतार पाहिले. हे चढ उतार त्यांनी आपल्या भाषणात विषद केले . शिक्षण क्षेत्रात 39 वर्ष सेवा दिली. त्याबद्दल त्यांना अभिमान वाटतो. 39 वर्षे सेवा पार करत असताना त्यांना ज्या ज्ञात अज्ञात कडून सहकार्य मिळाले .त्यांच्याविषयी त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली. तसेच सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांना चांगले घडवावे . हा मुलमंत्र त्यांनी दिला.

शेवटी कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप भगवान सोनवणे यांनी केला. यावेळी सदर कार्यक्रमास भोंडवे परिवारावर प्रेम करणारे त्यांचा मित्रपरिवार, नातेवाईक, आप्तेष्ट , व तालुक्यातील केंद्रीय मुख्याध्यापक, खांडे पारगाव केंद्रातील घटक शाळेचे मुख्याध्यापक, केंद्रातील सर्व शिक्षक शिक्षिका मोठ्या संख्येने कार्यक्रमास उपस्थित होत्या. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कचरू चांभारे यांनी केले. तर शेवटी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन बिबीशन क्षीरसागर यांनी केले.

## पंडीत दिनदयाळ स्वयम योजना 10 ऑगस्टपर्यंत मुदतवाढ

बीड, दि.2 : जिल्हयातील भटक्या जमाती (भटक्या जमाती -क) वर्गासाठी पंडीत दिनदयाळ स्वयम योजना आहे. या योजनेमध्ये शिष्यवृत्ती देण्यात येते. यापूर्वी या योजनेची मुदत 30 जुलै 2024 पर्यंत होती. ती आता 10 ऑगस्टपर्यंत वाढविण्यात आलेली आहे. तरी धनगर समाजाच्या विद्यार्थ्यांनी इतर मागास बहूजन कल्याण बीड येथे अर्ज सादर करुन या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याणचे सहाय्यक संचालक एस.एन. मेश्राम यांनी केले आहे.

## माजलगाव येथे वंचित मध्ये असंख्य ओबीसी बांधवांचा जाहीर प्रवेश-भारत तांगडे



**बीड /प्रतिनिधी**

आरक्षण बचाव यात्रा प्रकाश आंबेडकर यांचे नेतृत्वाखाली मुंबई येथून सुरू झाली आहे. आरक्षण बचाव यात्रेच्या सातव्या दिवशी बीड जिल्ह्यातील माजलगाव तालुक्यात आगमन झाले. माजलगाव व धारूर तालुक्यातील नागरिकांनी ॲड.प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून ५४ ओबीसी कार्यकर्ते व इतर ६८ कार्यकर्त्यांचा वंचित बहुजन आघाडी मध्ये जाहीर प्रवेश केला त्यामध्ये एकुण - १२२ कार्यकर्ते बीड जिल्हा पूर्व व पश्चिम च्या प्रमुख जिल्हा पदाधिकारी यांच्या उपस्थितीत घेतला प्रवेश. पक्ष प्रवेशाचे नियोजन सनी गायसमूद्रे व मित्र परिवार.या प्रसंगी बीड जिल्हा उपाध्यक्ष पश्चिमचे भारत तांगडे, पुर्व विभागाचे जिल्हा उपाध्यक्ष सचिन उजगरे, जिल्हा संघटक प्रा.बळीराम सोनवणे, जिल्हा उपाध्यक्ष सुरेश बचुटे,अण्णा साहेब मस्के,जिल्हा सहसचिव पुरुषोत्तम विर, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख बालाजी जगतकर, तालुका संघटक लक्ष्मण जाधव यांच्या उपस्थितीमध्ये पक्षप्रवेशाचा कार्यक्रम घेण्यात आला. आगामी काळात वंचित बहुजन आघाडी अधिक मजबूत करण्यासाठी संघटनात्मक बांधणीवर भर दिला जात आहे. त्याचाच एक भाग म्हणून हा पक्षप्रवेश सोहळा महत्त्वाचा ठरला आहे. या कार्यक्रमाला जिल्हा, तालुका, शहर व गाव पातळीवरील पदाधिकारी कार्यकर्तेमोठ्या संख्येने उपस्थित होते.



# सर्वसामान्य जनता म्हणू लागली पै.सतीश शिंदेच आमचे पुढचे आमदार!

## आष्टी-पाटोदा-शिरूर मतदारसंघात पै.सतीश शिंदे यांच्या नावाला पसंती!

### आमचा पुढचा आमदार आबाच!

येणाऱ्या विधानसभेत आमदार म्हणून सतीश शिंदे यांना पाहण्यासाठी तरुणाई आणि सर्वसामान्य जनता उत्सुक आहे. कोणत्याही पक्षांनी त्यांना तिकीट द्यावं निवडून आणण्याची जबाबदारी सर्वसामान्य जनता आणि तरुणाई घ्यायला तयार आहे असं देखील गावागावांमध्ये चर्चेला उधाण येत आहे. पक्ष महत्त्वाचा नसून पै.सतीश शिंदे सारखा आमदार आम्हाला मिळावा एवढीच अपेक्षा आहे..

आष्टी | प्रतिनिधी बीड जिल्ह्यातील सर्वात महत्त्वाचा आणि मोठा मतदार संघ म्हणजेच आष्टी मतदार संघ या मतदारसंघात आष्टी पाटोदा शिरूर हे तीन तालुके येत असून या तीनही तालुक्यात नवीन चेहऱ्याला अधिक महत्त्व दिले जातं. येणाऱ्या विधानसभेसाठी देखील नवीन चेहरा म्हणून पै.सतीश शिंदे यांचे नाव सर्वात आघाडीवर आहे. गेल्या वेळेस आमदार बाळासाहेब आजबे व सतीश शिंदे यांच्या तिकिटामुळे चुरस पाहायला मिळाली आणि त्यात काकांना तिकीट मिळालं. सर्वसामान्य जनता तरुणांमध्ये नाराजी देखील पाहायला मिळाली पण पुन्हा आबा आमदार होतील अशी अपेक्षा आणि त्या पद्धतीने कामाला लागलेली जनता आणि तरुणाई सुद्धा पाहायला मिळाली. येऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीसाठी आष्टी मतदार संघातून तरुणाईचा आणि सर्वसामान्य मतदारांचा नवीन चेहरा म्हणून पै.सतीश आबा शिंदे यांच्याकडे पाहिलं जात असून त्यांना आमदार करण्यासाठी सर्वांनीच पुढाकार घेतला आहे आणि कामाला देखील लागले आहे. येणाऱ्या विधानसभेला सतीश शिंदे यांना आमदार करण्यासाठी सर्वांनीच आपापल्या परीने काम सुरू केलेले देखील पाहायला मिळत असून सर्वसामान्य जनतेमध्ये त्यांच्या नावाची चर्चा जोरदार सुरू आहे. कोणत्याही पक्षाच तिकीट मिळावं त्यांना आमदार करण्यासाठी सर्व सामान्य जनता आणि तरुणाई सज्ज आहे असे देखील बोलले जात आहे..

# सोमवारी लोकशाही दिन

बीड, दि. 2 जिल्हास्तरीय लोकशाही दिन सोमवार दिनांक 5 ऑगस्ट, 2024 रोजी सकाळी 10-00 ते दुपारी 12-00 या वेळेत जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजन करण्यात आले आहे.

लोकशाही दिनात अर्जदाराने विहित नमुन्यातील अर्ज 15 दिवस अगोदर दोन प्रतीत सादर करणे आवश्यक आहे. लोकशाही दिनासाठी अर्ज देताना संबंधित तालुक्यातील तिसऱ्या सोमवारी तालुकास्तरीय लोकशाही दिनामध्ये अर्ज दिलेला असावा व तालुकास्तरीय लोकशाही दिनात एक महिन्यापेक्षा जास्त कालावधी होऊन देखील कोणतीही कार्यवाही झालेली नसावी अशाच अर्जदारांनी टोकन क्रमांकाच्या पावतीसह अर्ज दोन प्रतीत सादर करावा.

लोकशाही दिनामध्ये न्यायप्रविष्ट प्रकरणे, राजस्व, अपील, सेवाविषयक, आस्थापनाविषयक बाबी, विहित नमुन्यात नसणारे व आवश्यक ती कागदपत्रे न जोडलेले अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. तसेच तालुकास्तरीय लोकशाही दिनातील टोकन क्रमांकाची तहसिलदार यांच्या स्वाक्षरीची पोहोच पावती व त्यासाठी दिलेल्या मुदतीत व नमुन्यात ज्यांनी यापूर्वीच्या आवश्यक कागदपत्रासह अर्ज केले असतील त्यांना तक्रार मांडता येईल. ज्यांनी यापूर्वी जिल्हास्तरावरील लोकशाही दिनी तक्रार अर्ज दिलेला आहे परंतु अद्याप कार्यवाही झालेली नाही, अशा तक्रारदारांनी पुन्हा अर्ज करु नयेत.

# मुस्लिम विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी मौलाना आझाद रिसर्च ट्रेनिंग इन्स्टिट्यूट मार्टी स्थापन करावी-वसीम बुरहाण



**परतूर/प्रतिनिधी** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी महाराष्ट्र प्रदेश अल्पसंख्याक विभागाचे राज्य कार्याध्यक्ष श्री. वसीम बुऱ्हाण आणि शिष्टमंडळाने अजित पवार उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रीय अध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष यांची भेट घेतली. व अल्पसंख्याक मुस्लिम विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी मौलाना आझाद रिसर्च ट्रेनिंग इन्स्टिट्यूट मार्टीची स्थापना करण्यात यावी, अश्या मागणीचे निवेदन पत्र अजीत पवार यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले. अजित पवार यांनी सकारात्मक चर्चा करून यासंदर्भात निर्णय घेण्यात येईल असे आश्वासन राष्ट्रवादी काँग्रेस अल्पसंख्यांक विभागाचे वसीम बुरहान व शिष्ट मंडळास दिले.

# मनोज जरांगे-पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त जि.प.प्र.केंद्र शाळा कव्हे येथे शालेय साहित्य व खाऊवाटप.

सोलापूर/विश्वास चोपडे संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त जि.प.प्र.केंद्र शाळा कव्हे येथे २ ऑगस्ट २०२४ रोजी जिल्हा परिषद शाळेमध्ये प्रत्येक विद्यार्थ्यांना वही पेन व बिस्कीट पुडा देऊन सकल मराठा समाजाच्या वतीने मनोज जरांगे पाटील यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी उपस्थित शाळेचे मुख्याध्यापक शिक्षक शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष शाळा व्यवस्थापन समिती सदस्य इत्यादी उपस्थित होते.



# सागर जैवाळ यांची पुन्हा राष्ट्रीय फुले ब्रिगेड महाराष्ट्र मिडिया प्रभारी फेरनिवड.


**संभाजीनगर प्रतिनिधी :-** संभाजीनगर सिल्लोड येथील सागर संजय जैवाळ यांची राष्ट्रीय फुले ब्रिगेड महाराष्ट्र मीडिया प्रभारी पदी फेरनिवड करण्यात आली. सामाजिक जीवनात कार्य करत असताना विविध विषयावरती अभ्यासपूर्वक मत मांडणे. सामाजिक कार्य मध्ये अग्रेसर राहणे. त्यांचा या कार्याची दखल घेत राष्ट्रीय फुले ब्रिगेड महाराष्ट्र मिडिया प्रभारी फेरनिवड करण्यात आली असून राष्ट्रीय फुले ब्रिगेड चे प्रदेशाध्यक्ष प्रवीण बनसोडे, प्रदेश प्रभारी अमोल बारवकर, केंद्रीय कोअर कमिटी विनोद माळी यांनी सागर जैवाळ यांना नियुक्ती पत्र दिले. निवडीबाबत बोलताना सागर जैवाळ बोलले की आपण सर्वसामान्य माणसापर्यंत फुले ब्रिगेड चे विचार पोहचवणे व सर्वसामान्यांना मदत करण्याचे कार्य हे अहो रात्र चालु ठेवणार आहे.सागर जैवाळ यांचे समाज बांधव व संभाजीनगर मित्र मंडळ तर्फे शुभेच्छा चा वर्षाव करण्यात आला



# उगवली ग्रंथालये जगती

शिरळ (ता. चिपळूण, जि. रत्नागिरी) वाचनालयाचे संस्थापक गिरीधर रामचंद्र साठे यांनी वाचनालयाच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त ग्रंथालय चळवळीविषयी लिहिलेला माहितीपूर्ण लेख - आज जगाच्या पाठीवर देशोदेशी असलेल्या नावाजलेल्या कार्यरत ग्रंथालयापासून खेडोपाडी तग धरून राहिलेल्या ग्रामीण ग्रंथालयांची नाळ प्राचीन काळाशी जोडली आहे. हे विसरून चालणार नाही. प्राचीन काळातील इजिप्त आणि अलसदिया या देशांकडे पाहू. (या देशांचेच उदा. घेऊ) या देशांमध्ये मुख्यत: देशाचा कारभार हाकण्यासाठी निर्मिलेली शासकीय कागदपत्रे आणि संस्कृती वर्धन / धर्मप्रचार प्रक्रियेत निर्माण झालेले 'धार्मिक वाचन साहित्य', 'अभिलेखागारे' निर्माण केली गेली. ही अभिलेखागारे म्हणजे त्या देशातील त्या काळातील ग्रंथालये होत. अशाप्रकारे इजिप्त आणि ग्रीस या देशात ग्रंथालये असल्याची इतिहासात नोंद आढळते.

मध्ययुगीन काळात हस्तलिखित पोथ्या जतन करून ठेवल्या जात. राजे महाराजे आपले स्वतंत्र ग्रंथसंग्रह ठेवत असत. मध्ययुगीन काळात मुस्लिम देशांमध्येही ग्रंथालये होती. अरब बगदाद आदी ठिकाणी ग्रंथालये अस्तित्वात होती. अगदी इतिहासात डोकावले तर मनुष्य प्राण्याला व्यक्त होण्याची निकड भासली, तेव्हा नेहमीच्या बोलण्या-चालण्यातून, लेखनातूनव्यक्त होऊ लागला. 'जे जे आपणास ठावे, ते ते इतरांसि सांगावे' तसे आपण लिहिलेले इतरांना एकूण समाजजीवनास उपयोगी पडावे, असा एक सद्विचार समाजमनात डोकावत राहिला असावा. मग कुठेतरी दगडात कोरून, ते अगदी मोठमोठे शिलालेख, हस्तलिखिते, पोथ्या-पुराणे, विविध विषयांवरील हस्तलिखित ग्रंथ अशी वाटचाल सुरू झाली. पुढे छपाईची कला अस्तित्वात येऊन छापील साहित्य निर्मिती साधली गेली. अगदी एकविसाव्या शतकात तर पुढे जाऊन अनेकविध माहिती साधने, संगणकीय स्वरूपात आज विपूल प्रमाणात अस्तित्वात आहेत.



आता सर्वसाधारणपणे अशी उपलब्ध सर्व प्रकारची हस्तलिखिते, छापील वा अन्य माहिती साधने (संगणकीय युग निर्मित) जनहितार्थ एकत्रितपणे ठेवण्याची निकड भासली. त्यासाठी जी सुयोग्य वास्तू / जागा ती म्हणजे 'ग्रंथालय.' भारतात प्राचीन साम्राज्य मगध म्हणजे तत्कालिन भारताची शान. म्हणून दूरदूरच्या देशातून अध्ययनासाठी विद्यार्थी येथे येत असत. प्राचीन भारतात या नालंदा विश्वविद्यालयाचे अतीसमृद्ध ग्रंथालय होते. प्राचीन भारतीय विद्यापीठ 'तक्षशीलेचे' ग्रंथालय हे सर्व जगात प्रसिद्ध होते. अनेक ग्रीक तसेच चिनी प्रवासी या ग्रंथालयास भेटी देवून गेल्याच्या नोंदी आहेत. शैक्षणिक संस्थांमधून वा मंदिरामधून (पोथ्या पुराणे) स्वरुपात ग्रंथालये अस्तित्वात होत. पण ती एका विशिष्ट घटकांसाठीच उलपब्ध होत. त्याकाळी संपूर्ण जनतेसाठी म्हणून सार्वजनिक ग्रंथालय ही कल्पनाच फारशी अस्तित्वात नव्हती. अर्थातच एकूण समाजाच्या उन्नती देश-विदेशीच्या शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक उन्नतीसाठी आणि जगत्कल्याणासाठी अशा सार्वजनिक ग्रंथालयांच्या निर्मितीची समाजजीवनास नितांत गरज होती. आता जनमानसासाठी सार्वजनिक ग्रंथालय ही संकल्पना विकसित होऊ लागली

**गिरीधर साठे**

# उरण आगारातून गणेशोत्सव काळात कोकणात जाण्यासाठी ज्यादा बसेस सोडण्याची मागणी



**उरण/विठ्ठल ममताबादे** कोकणवासीय उत्कर्ष संस्था उरण ही कोकण वासियांच्या न्याय हक्कासाठी लढणारी संघटना असून कोकणवासीयांच्या न्याय हक्कासाठी ही संघटना नेहमी कटिबद्ध असते. कोकणातील कोकणीवासीयांचा महत्त्वाचा सण म्हणजे गणेशोत्सव. या गणेशोत्सव काळात मुंबई, नवी मुंबई,रायगड जिल्ह्यात काम करणारे उद्योग धंदा नोकरी करणारे चाकरमानी वर्गांना कोकणात जाण्यासाठी व गणेशोत्सव संपल्यानंतर परत उरण मध्ये येण्यासाठी तसेच जनतेचा प्रवास सुलभ करण्यासाठी कोकणवासीय उत्कर्ष संस्था उरण तर्फे उरण बस आगारातून कोकणातील रत्नागिरी सिंधुदुर्ग राजापूर कणकवली देवरुख माणगाव खेड दापोली गणपतीपुळे आदि ठिकाणी ज्यादा बसेस सोडण्यात यावे.व तेथून परत उरण मध्ये येण्यासाठी ज्यादा बसेस सोडण्यात यावेत. तसेच या बसेसची ऑनलाईन बुकिंग गणेशोत्सव पूर्वी करावे अशी मागणी कोकणवासीय उत्कर्ष संस्था उरणचे सचिव रविंद्र पांडुरंग चव्हाण यांनी महाराष्ट्र शासनाचे राज्य परिवहन महामंडळ मुंबईचे महाव्यवस्थापक व उरण बस आगाराचे व्यवस्थापक यांच्याकडे पत्रव्यवहाराद्वारे केली आहे. दरवर्षी कोकणवासीय उत्कर्ष संस्था उरण तर्फे गणेशोत्सव व होळी सणाच्या काळात कोकणात जाण्यासाठी व कोकणातून परत उरण मध्ये येण्यासाठी ज्यादा बसेसची मागणी केली जाते. त्याला राज्य मार्ग परिवहन महामंडळाचा नेहमी उत्तम प्रतिसाद मिळत असतो.याही वर्षी राज्य परिवहन महामंडळ कोकणवासीय जनतेची मागणी लक्षात घेऊन कोकणात जाण्यासाठी व कोकणातून परत उरणला येण्यासाठी ज्यादा बसेसची व्यवस्था करेल अशी अपेक्षा कोकणवासीय उत्कर्ष संस्था उरणचे सचिव रवींद्र चव्हाण यांनी व्यक्त केली आहे.



**बीड शहरातील योद्ध अकॅडमी अभय नागरगोजे कुमार देवकर यांची एस.आर. पी.एफ मध्ये निवड, योद्धा अकॅडमीचे संचालक कृष्णा पाठक ललित अब्बाड , संपादक बालाजी जगतकर शुभेच्छा देताना दिसत आहेत.**

# कंत्राटी कामगारांच्या प्रलंबित प्रश्नाबाबतीत ऊर्जामंत्र्यांच्या घरा समोर कंत्राटी वीज कर्मचाऱ्यांचे आमरण उपोषण.

**उरण/विठ्ठल ममताबादे** आचार संहितेची चाहूल लागल्या नंतर भारतीय मजदूर संघाशी संलग्न महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघाने ऊर्जा खात्यातील कंत्राटी कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी आता १२ ते १७ ऑगस्ट २०२४ या कालावधीत साखळी उपोषणाचा मार्ग पत्करला आहे. २० ऑगस्ट २०२४ रोजी सरकार मधील सर्व मंत्र्यांच्या दारात लाक्षणिक आंदोलन तर २४ ऑगस्ट २०२४ रोजी रेशीमबाग मैदान ते राज्याचे उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री मा.देवेंद्रजी फडणवीस यांच्या नागपुरातील घरा पर्यंत मोर्चा काढून तेथे वीज कंत्राटी कामगार बेमुदत आमरण उपोषण करणार असल्याचे संघटनेचे प्रदेश अध्यक्ष निलेश खरात यांनी सांगितले आहे. तिन्ही वीज कंपनीतील कंत्राटी कामगारांचे शोषण कायमस्वरूपी थांबण्यासाठी नॉमिनल मस्टर रोल किंवा हरियाना सरकार प्रमाणे कंत्राटदार विरहित वयाच्या ६० वर्षा पर्यंत शाश्वत रोजगार मिळावा, मागणी पत्रका प्रमाणे वेतनात वाढ मिळावी, व प्रलंबित समस्यां सोडवाव्यात या मागण्या करिता मागील कालावधीत अनेक वर्षापासून सातत्याने पाठपुरावा चालू आहेत. या बाबतीत मा.उर्जा मंत्री यांनी आस्वासने दिली होती, पण अद्याप पर्यंत अंमलबजावणी झालेली नाही यासाठी हे आंदोलन असल्याचे प्रदेश सरचिटणीस सचिन मेंगाळे यांनी कळविले आहे. राज्यातील सर्व संघटना व कामगार यांनी या निर्णायक आंदोलनास पाठिंबा द्यावा असे आवाहन संघटन मंत्री उमेश आणेराव यांनी केले. या बाबतीत संघटनेने सरकाराला व प्रशासनाला लेखी नोटीस दिली आहे.



# लिंबागणेश प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकारी कर्मचाऱ्यांनी स्वखर्चाने संरक्षक कुंपण बांधुन वृक्षारोपण केले

**लिंबागणेश /प्रतिनिधि**

लिंबागणेश:-( दि.१ ) जागतिक तापमान वाढीच्या दरासाठी बेसुमार वृक्षतोड हि फार मोठी समस्या बनली असुन तापमानाचे नियमन आणि पावसाला पोषक हवामान बनवण्यासाठी झाडे महवाची भुमिका बजावत असुन कोरोना कालावधीत झाडांचे महत्त्व काय असते हे सर्वांनी जाणले असल्याने प्रत्येकाने झाडे लाऊन झाडांचे संगोपन करणे गरजेचे असुन वृक्षारोपण काळाची गरज असल्याचे मत व्यक्त करत आज दि.१ ऑगस्ट गुरुवार रोजी लिंबागणेश प्राथमिक आरोग्य केंद्रात वृक्षारोपण करण्यात आले. केवळ वृक्षारोपण नव्हे तर संगोपनासाठी वैद्यकीय अधिकारी रूपाली चिटकुलवार आणि त्यांचे प्राथमिक आरोग्य केंद्रातील सहकारी यांनी स्वखर्चाने




तारेचे संरक्षक कुंपण तयार करूनच वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी चिंच ,पिंपळ,आंबा, बदाम ,चिकु,गुलमोहर ,सिसम तसेच फुलझाडे लावण्यात आली. यावेळी प्राथमिक आरोग्य केंद्रातील कर्मचारी लोखंडे, गर्जे, कंचार,उपकेंद्रातील समुदाय आरोग्य अधिकारी डॉ.जाधव, डॉ.कोठावळे,डॉ.राऊत,आरोग्य सेविका गिरे, शिंदे,चौरे, क्षीरसागर, वीर,आरोग्य कर्मचारी वीर, कदम, गायकवाड,सापते लांडगे प्रयोग शाळा तंत्रज्ञ, दत्तात्रेय झोडगे वाहन चालक आणि परिचर सुरेश आवसरे वृक्षारोपण कार्यक्रमात सहभागी होते. स्वखर्चाने संरक्षक कुंपण करून वृक्षलागवड करणा-या वैद्यकीय अधिकारी डॉ . रुपाली चिटकुलवार आणि कर्मचाऱ्यांचा ग्रामपंचायत मार्फत सत्कार लिंबागणेश प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी डॉ.रूपाली चिटकुलवार यांनी वृक्षारोपणाबरोबरच त्यांच्या संगोपनासाठी संरक्षक करणे आवश्यक असल्याने स्वतः २० हजार रुपये खर्चून तारेची संरक्षक कुंपण आणि लोखंडी गेट बसवले तसेच ईतर कर्मचाऱ्यांनी जवळपास ५००० रूपये खर्चून लागवडीसाठी वृक्षाची रोपे खरेदी केली. यामुळे प्राथमिक आरोग्य केंद्राच्या सुशोभिकरणात भर पडणार असुन या कौतुकास्पद उपक्रमाबद्दल ग्रामपंचायतीच्या वतीने सरपंच बालासाहेब जाधव, उपसरपंच बाळकृष्ण थोरात,ग्रां.स. रमेश गायकवाड, पत्रकार हरिओम क्षीरसागर आणि डॉ.गणेश ढवळे यांनी वैद्यकीय अधिकारी डॉ.रुपाली चिटकुलवार आणि कर्मचाऱ्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.


# ऊसतोड कामगारांसाठी विशेष तरतूद करा; आरोग्याचे प्रश्नही सोडवा

## खा.बजरंग सोनवणेंनी लोकसभा सभागृहातील पहिल्याच भाषणात मांडले बीडकरांचे प्रश्न, मुद्देसूद केलेल्या भाषणाची जिल्हाभर चर्चा

**बीड: माझ्या बीड जिल्ह्याला ऊसतोड कामगारांचा जिल्हा अशी ओळख आहे.याठिकाणी ऊसतोड कामगारांच्या नावावर केवळ राजारकण केले, मात्र त्यांच्यासाठी कुठल्याही सोयीसुविधा आजवर दिल्या नाहीत. त्यांच्यासाठी विशेष तरतूद करा आणि बीड जिल्ह्यात आरोग्य यंत्रणेला उभारी देण्यासाठी विशेष प्रयत्न करा, रिक्त जागा, अत्याधुनिक मशीनरी आणि रूग्णालये मंजूर करा, अशी मागणी खा.बजरंग सानवणे यांनी लोकसभा सभागृहात पहिल्याच भाषणात केली. त्यांनी केलेल्या मुद्द्देसूद भाषणाची जिल्हाभर चर्चा होत आहे.**

**बीड प्रतिनिधी**

दिल्ली येथे लोकसभा अधिवेशन सुरू असून दि.२ ऑगस्ट रोजी आरोग्य मंत्री यांच्या उपस्थितीत खा.बजरंग सोनवणे यांनी सभागृहातील पहिले भाषण केले. यावेळी बोलताना ते म्हणाले,मी जिथे राहतो त्या भागाची ओळख ऊसतोड कामगारांचा जिल्हा अशी आहे. ऊसतोड कामगारांचा जिल्हा म्हणून माझ्या जिल्ह्यावर फक्त राजकारण केलं गेलं. मात्र माझ्या ऊसतोड कामगारांसाठी कुठल्याही सोयीसुविधा आजवर या राजकारण्यांनी दिल्या नाही. या ऊसतोड कामगारांसाठी विशेष तरतूद करावी. हातात कोयते घेऊन रात्रंदिवस आमच्या मायमाऊल्या शेतावर ऊस तोडतात. त्यांचेही प्रश्न सोडवले गेले पाहिजेत.




तर आरोग्य विभागाच्या दृष्टीने बोलताना ते म्हणाले, जिल्ह्यात एक वैद्यकीय महाविद्यालय, मोठे सरकारी इस्पितळ, शेकडो आरोग्य केंद्र आहेत. परंतु या आरोग्य केंद्रांवरती स्टाफच उपलब्ध नाही. या सुविधा आपण उपलब्ध करून द्याव्यात. जिल्ह्याला शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नाही. आमच्या लेकरांच्या शिक्षणाचा हा प्रश्न मोठा गंभीर आहे. त्यामुळे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय झाले तर इथल्या गुणवान विद्यार्थ्यांच्या कष्टाला फळ येऊन ते इथेच आपले शिक्षण पूर्ण करून वैद्यकीय सेवा देतील. त्यामुळे विशेष पॅकेज देऊन हे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय या ठिकाणी झालेच पाहिजे.जिल्ह्याच्या ठिकाणी स्त्री रुग्णालय सुद्धा नाहीये. इथे स्त्री रुग्णालय झाले पाहिजे. महिलांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी स्त्री रुग्णालयाची अत्यंत आवश्यकता जिल्ह्याला आहे.अंबाजोगाई शहरात जे वैद्यकीय महाविद्यालय आहे, तेथे ५० विद्यार्थ्यांची क्षमता असताना कर्मचाऱ्यांची भरती करण्यात आली होती. आज तिथे विद्यार्थ्यांची संख्या १५० झाली आहे. परंतु स्टाफ मात्र तेवढाच आहे. डॉक्टर, नर्सेस, वर्ग ३, ४ हा स्टाफ तेव्हा भरती झाला. तेवढाच मर्यादित आहे.त्यामुळे इथे आता नव्या कर्मचाऱ्यांची गरज आहे. ती वाणवा सरकारने तात्काळ भरून काढावी, अशी आग्रही मांडणी त्यांनी केली.

### ‘सिटीस्कॅन’चा प्रश्न सभागृहात पोहचला

**अंबाजोगाईच्या दवाखान्यातील सिटीस्कॅनची मशीन वारंवार बंद पडते. त्यामुळे रुग्णांची हेळसांड नेहमीचीच आहे. तिथे नवीन मशीन घेण्यासाठी स्थानिक प्रशासनाला सूचना आरोग्यमंत्र्याच्या माध्यमातून करण्यात याव्यात. तसेच जिल्हा रुग्णालयात व्हेंटिलेटर व इतर आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या सूचना द्याव्यात. असेही ते म्हणाले.**

### जरांगे पाटील, पवारांना नमस्कार..

लोकसभेतील पहिल्या भाषणात शेतकऱ्यांचे आभार मानल्यानंतर खा.सोनवणे यांनी मराठा योध्दा मनोज जरांगे पाटील, राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांना नमस्कार करून त्यांच्या समाजाभिमुख कार्याचे स्मरण करतो. असे म्हणत जिल्ह्याच्या मागण्या मांडण्यास सुरुवात केली.

### मराठीतूनच केले भाषण

लोकसभेतील माझे पहिले भाषण.. मराठी ही आपली जन्मभाषा असल्याने मराठीतूनच बोलणार, असे सांगून माझे संपूर्ण भाषण मराठीत केले. यावेळी त्यांनी माझी शेतकरी पुत्र अशी ओळख असून एक सामान्य शेतकरी पुत्र संसदेत पोहोचला, तो शेतकऱ्यांनी पोहचवला, त्याबद्दल शेतकऱ्यांचे आभार मानले.

### ‘त्याला’ आरोग्यव्यवस्थाही कारणीभूत

बीड जिल्ह्यात लिंग गुणोत्तर १ हजार पुरुषांमागे ९३३ महिला असे आहे. याला वर्षानुवर्षे चालत आलेली आरोग्यव्यवस्था तेवढीच कारणीभूत आहे.या मुद्यांसह इतर अनेक मुद्द्यांवर यावेळी आग्रहपूर्वक प्रश्न मांडले.

# छत्रपती शिवाजी महाराजांचे गड किल्ले जाज्वल्य अभिमान देणारा ऐतिहासिक वारसा - मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

## स्वराज्य निर्मितीत मोलाचे योगदान देणारे १२ किल्ले जागतिक वारसा यादीत समाविष्ट होण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न

**मुंबई/प्रतिनिधी**

मुंबई, दि. 2: छत्रपती शिवाजी महाराज यांनी बांधलेले गड किल्ले केवळ वास्तू नसून सर्वांना प्रेरणा आणि जाज्वल्य अभिमान देणारा ऐतिहासिक वारसा आहे. या वारशाला जागतिक पातळीवर नेण्यासाठी जे आवश्यक असेल ते सर्व प्रयत्न राज्य शासन निश्चितपणे करेल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. सर्वांच्या प्रयत्नाने स्वराज्य निर्मितीत मोलाचे योगदान देणारे छत्रपती शिवाजी महाराजांचे हे 12 किल्ले नक्कीच जागतिक वारसा यादीत समाविष्ट होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. राज्य शासनाचा सांस्कृतिक कार्य विभाग आणि पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालयाच्या वतीने ‘भारतातील मराठा लष्करी भूप्रदेश’ जागतिक वारसा नामांकनाबाबत सह्याद्री अतिथीगृह येथे बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी ते बोलत होते. सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार, कौशल्य विकास विभागाचे मंत्री मंगल प्रभात लोढा, जागतिक वारसा समितीच्या 46 व्या अधिवेशनाचे अध्यक्ष आणि युनेस्को मधील भारताचे राजदूत व स्थायी प्रतिनिधी विशाल शर्मा, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव तथा सांस्कृतिक कार्य विभागाचे प्रधान सचिव विकास खारगे, भारतीय पुरातत्व विभागाचे अतिरिक्त महानिदेशक डॉ. जान्विज शर्मा, भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाच्या क्षेत्रीय संचालक डॉ. टी. श्रीलक्ष्मी, अधीक्षक शुभा मुजुमदार, सांस्कृतिक कार्य विभागाच्या उपसचिव नंदा राऊत, राज्याचे पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालयाचे संचालक सुजितकुमार उगले आदींची यावेळी उपस्थिती होती.

जागतिक वारसा स्थळांच्या यादीत महाराष्ट्रातील लष्करी भूप्रदेश या वैशिष्ट्यपूर्ण वारशाचा समाविष्ट व्हावा यासाठी भारताकडून प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. महाराष्ट्रातील साल्हेर, शिवनेरी, लोहगड, रायगड, सुवर्णदुर्ग, पन्हाळा, विजयदुर्ग, सिंधुदुर्ग, खांदेरी, राजगड, प्रतापगड हे 11 आणि तमिळनाडू येथील जिंजी अशा 12 किल्ल्यांचा यामध्ये समावेश आहे. या नामांकन प्रक्रियेचे ठोस समर्थन व्हावे आणि याबाबत अधिक मार्गदर्शन होण्याच्या उद्देशाने जागतिक वारसा समितीच्या 46 व्या अधिवेशनाचे अध्यक्ष श्री. विशाल शर्मा यांना निमंत्रित करण्यात आले होते. त्यावेळी मुख्यमंत्री श्री.शिंदे बोलत होते. मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज यांचे 12 गड किल्ले जागतिक वारसा नामांकन प्रक्रियेसाठी पाठविण्याचा निर्णय घेण्यात आला. त्याबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि भारतीय पुरातत्व विभाग यांचे विशेष धन्यवाद मानले पाहिजे. छत्रपती शिवाजी महाराज हे असामान्य महापुरुष होते. स्वराज्याची निर्मिती करून त्यांनी एक जाज्वल्य असा इतिहास निर्माण केला. त्यांच्या काळात झालेल्या गड किल्ल्याची निर्मिती ही त्यांची दूरदृष्टी दाखवून देते. जलदुर्गाची निर्मिती करुन त्यांनी स्वराज्य संरक्षणासाठी किती जागरुकता हवी, हे त्याकाळी दाखवून दिले. शत्रुला नामोहरम करण्यासाठी त्यावेळचे तंत्रज्ञान, वास्तू शास्त्र यांचा अप्रतिम आविष्कार त्यांनी दाखविला. शिवकालीन हे किल्ले पुनर्जीवित करण्याचा प्रयत्न आपण करत आहोत. आजही हे किल्ले मजबूत स्थितीत आहेत. येथील कणाकणात छत्रपती शिवाजी महाराजांच्या आठवणी आहेत. हा इतिहास आपल्या सर्वांना प्रेरणा देणारा आहे. तो आपण जपत आहोत. त्याला जागतिक पातळीवर नेण्याची संधी आपल्याला मिळाली आहे, असे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी नमूद केले.

# वसुंधरा विद्यालयास प्र-कुलगुरु डॉ वाल्मीक सरवदे यांची सदिच्छा भेट



**केज/सचिन भालेराव**

तालुक्यातील पैठण येथील वसुंधरा माध्यमिक व उच्च विद्यालयास डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे प्र कुलगुरू प्रा.डॉ. वाल्मीक सरवदे यांनी शुक्रवार रोजी सदिच्छा भेट दिली. विद्यालयाचे मुख्याध्यापक सुशील कुमार गायकवाड यांच्या हस्ते डॉ वाल्मीक सरवदे व वैशाली सरवदे यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. डॉ सरवदे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी ते म्हणाले विद्यार्थ्यांना परिस्थितीची जाण ठेवून विद्यार्थ्यांनी सतत अभ्यासावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. प्रयत्नातून यश मिळते असे मत त्यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे आभार श्री चौधरी यांनी मानले यावेळी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मी विधानसभेची निवडणूक लढवणारच –माजी आमदार संगिता ठोंबरे



## पाठपुरावा करून मंजूर करून आनलेल्या कामाचे श्रेय कोणीही घेवो हे जनतेला माहित आहे काम कोणी केले

## आम्ही मंजूर केलेली कामे पण अजुन पूर्ण होऊ शकली नाहित

**केज मतदार संघात कन्स्ट्रक्टिव्ह काम करण्यासाठी मी माझ्या काळात पूर्ण प्रयत्न केलेले आहेत धनेगाव धरणाखाली पर्यटन विभागाकडून एक छानशी बाग बोटिंग वगैरे करण्यासाठी प्रयत्न केलेले आहेत तेही काम कदाचित माझ्याच हाती होईल असे सांगताना विद्यमान आमदार नमिता मुंदडा यांच्या काम करण्याच्या पद्धतीवर चांगलाच आसूड ओढला तसेच माजी आमदार संगीता ठोंबरे यांनी सांगितले की माझ्या आमदारकीच्या काळात नेकनूर येथील बस स्टॅन्ड तसेच पाच सब स्टेशन चे काम मी करण्याच्या प्रयत्न केला होता सब स्टेशनचे काम पूर्ण झाले पूर्ण होत आले आता कदाचित मी नव्याने आमदार झाल्यावर त्याचे उद्घाटन होईल त्यामुळे मागील पाच वर्षांपूर्वी मी ज्या ज्या कामासाठी प्रयत्न केले ती कामे अद्यापही तसेच अवस्थेत आहेत विद्यमाने आमदारांनी त्यासाठी काहीच प्रयत्न केले नाहीत व ते काम मी माझ्याच पुढील कार्यकाळात पूर्ण व्हावी अशी नियत असावी असे पत्रकारांशी बोलताना माजी आमदार संगीता ठोंबरे यांनी सांगितले तसेच जनतेला कधीही डीपी दवाखाना या कामासाठी वाट पाहावी लागत नव्हते हे जनसेवेची कामे करून घेण्यासाठी अधिकारी असतात फक्त अधिकाऱ्यांनी काम करावे या सूचना देण्याचे काम मी केले होते व माझ्या काळात महिना महिना दोन दोन महिने डीपी मिळाली नाही असे कधीही झाले नाही तसेच दवाखान्यात उपचार घेण्यासाठी कोणाच्याही शिफारशीची गरज कधी लागली नाही असे बोलून विद्यमान आमदारांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण केले आता मी २०२४ ची निवडून निवडणूक लढवणार असल्याचे ठामपणे सांगून भारतीय जनता पक्षाकडे तिकिटाची मागणी केलेली आहे जर त्यांनी मला उमेदवारी नाकारली तर बाकीच्या पर्यंत नक्कीच विचार केला जाईल परंतु निवडणूक मी लढवणारच यावर माजी आमदार संगीता ठोंबरे ठाम आहेत.**

**केज/सचिन भालेराव**

माजी आ. संगीता ठोंबरे यांनी विद्यमान आ. नमिता मुदडा यांच्या निष्क्रियता बद्दल आभार व्यक्त केले व आम्ही आमच्या काळात जनहिताच्या मंजूर केलेल्या योजना पण या पाच वर्ष मध्ये पूर्ण होऊ शकले नाही हे दुर्दैवी आहे. कदाचित आम्ही मंजूर केलेल्या कामाचे उद्घाटन आमच्याच हस्ते व्हावे असे नियतीच्या मनात असावे असे संगीता ठोंबरे यांनी केज येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेत म्हणाल्या. माजी आमदार संगीता ठोंबरे या केज मतदार संघतून निवडणूक लढवण्यावर ठाम असून त्यांनी मतदारसंघात त्यांचा एक दौरा कंप्लिट झाला असून केज मतदार संघातील नागरिकांनी त्यांना भरघोस असा प्रतिसाद देत आहे विद्यमान आमदारावर प्रचंड नाराज असणारी जनता व जनता आमदारांच्या हस्तक्षेपामुळे त्रस्त झाले असल्यामुळे समोर कोण येणार याची वाट पाहत होता आणि माजी आमदार संगीता ठोंबरे यांच्या माध्यमातून एक चांगला आमदार पुन्हा पाहायला मिळेल अशी लोकांना अपेक्षा आहे लोकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी माजी आमदार संगीता ठोंबरे यांनी अगदी ठामपणे मी उभारणारच असे सांगितले आहे सध्या तरी भारतीय जनता पक्ष यांच्याकडेच उमेदवारी मागितली आहे परंतु समोर येणाऱ्या परिस्थितीनुसार निर्णय घेतला जाईल परंतु २०२४ ची निवडणूक ही माजी आमदार संगीता ठोंबरे यांनी निवडणूक लढणारच आहे यावर त्या ठाम आहेत असे दिसून येते या पत्रकार परिषदेत बोलताना संगीता ठोंबरे म्हणाले की माझ्या पाच वर्षाच्या कालावधीत जनतेची सेवा करण्याची संधी मला मिळाली त्यासाठी मी जनतेची ऋणी आहे व मी काम करण्याची पूर्ण क्षमतेने प्रयत्न केला आहे ते शहरात उभारणारे लोकनेते गोपीनाथ मुंडे सभागृह तसेच औद्योगिक क्षेत्रात लोकनेते गोपीनाथ मुंडे सहकारी सूतगिरणी उभारण्यासाठी प्रयत्न केले. सूतगिरणी लवकरच सुरु होईल हे शहरातील लोकनेते गोपीनाथ मुंडे नाट्यगृह उभारण्यासाठी पूर्ण प्रयत्न केले सार्वजनिक बांधकाम विभागाची जागा तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब चंद्रकांत दादा पाटील साहेब पंकजाताई मुंडे यांच्या आशीर्वादाने महाराष्ट्रातील पहिल्यांदाच ही जागा हस्तांतरित झाली त्यासाठी खूप प्रयत्न करावे लागले परंतु ही जागा हस्तांतरित झाली मी केलेल्या प्रयत्नांना कदाचित नियती म्हणून पुन्हा मी आमदार झाल्यावरच त्याचे काम सुरू होईल असे वाटते तसेच उमरी येवता येतील गायरान जमिनीवर औद्योगिक वसाहत निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले आहेत ज्यामुळे तरुणांना रोजगार उपलब्ध होण्याची संधी मिळेल त्यासाठी लागणाऱ्या पूर्ण तयारी झाली होती फक्त पाण्याची एक समस्या राहिली होती त्यासाठी कृष्णा खोरेतून तीन पीएमसी पाणी मिळवण्यासाठी मी पूर्ण क्षमतेने प्रयत्न केला होता कदाचित हेही काम मी आमदार झाल्यानंतर पूर्ण होईल अशी नियती असावी.

## केज तालुक्यातील अवैध धंद्यांचा बंदोबस्त करावा शिवसेनेकडून उपोषणाचा ईशारा.

**केज/प्रतिनिधी** केज पोलीस स्टेशन व युसुफवडगाव पोलीस स्टेशन हद्दीतील अवैध धंद्याचे जाळे फोफावत चालले आहे.गुटखा-मटका ,अवैध गो-वाहतुक,अवैध दारू विक्री, अवैध वाळु उपसा,अवैध चंदन तस्करी,अवैध ऑनलाईन गेम, अवैध गांज्या विक्री व अनेक अवैध धंद्यामुळे कित्येकांना आपला जिव गमवावा तर लागतोच या व्यसनांमुळे कित्येकांची घरे उद्वस्त झाली आहेत. अशा व्यसनापायी अनेक जन बेघर होऊन देशोधडीला वाहुन चुकीच्या मार्गाकडे लागत आहेत, अनेक युवक अश्या व्यसनांच्या नादी लागल्याने गुन्हेगारीच्या कुठल्याही थराला जात आहेत , गुन्हेगारी वाढण्यासाठी कारणीभुत ठरणाऱ्या अवैध दारू विक्री,गुटखा,मटका अशा प्रकारच्या अवैध धंद्यावर पोलीसप्रशासणाच्या दुर्लक्षणामुळे फोफावत चाललेला हा केज पोलीस स्टेशन व युसुफवडगाव पोलीस स्टेशन हद्दीतील अवैध धंद्याचा सुळसुळाट ८ दिवसात बंद करण्याच यावा,अन्यथा दि. ०८/०८/२०२४ रोजी तहसील कार्यालय केज या ठिकाणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने आमरण उपोषण करण्यात येईल असा ईशारा देण्यात आला.



स्वाक्षरी करून निवेदन देताना केज शिवसेना तालुकाप्रमुख अशोक जाधव,जिल्हासचिव रोहित कसबे,शहरप्रमुख तात्या रोडे,युवासेना तालुकाप्रमुख किशोर घुले,उपतालुकाप्रमुख सुभाष ठोंबरे,तालुका सचिव सखाराम वायबसे,ज्ञानेश्वर बोबडे,आप्पा कांबळे,पप्पू कोल्हे,रूषी घुले,बाबासाहेब देशमुख,पुरूषोत्तम घुले, नंदकिशोर गिते,कृष्णा केदार,अंगद देशमुख सह शिवसैनिक उपस्थित होते.

## लोह्यात प्रकाश आंबेडकर यांचे मा. नगराध्यक्ष गजानन सुर्यवंशी यांच्या वतीने दीड क्विंटललचा खारिक खोबऱ्याचा हाराने जंगी स्वागत

**लोहा /प्रतिनिधी**

वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा ओबीसी आरक्षण बचाव यात्रेचे प्रणेते माजी खासदार प्रकाश उर्फ बाळासाहेब आंबेडकर यांचे लोहा शसरात सुर्यवंशी कॉम्पलेक्स मेडरोड येथे लोहा नगरीचे लोकनियुक्त नगराध्यक्ष गजानन सुर्यवंशी यांच्या वतीने लोहा शहरांच्या परंपरेनुसार खारिक खोबऱ्याचा भला मोठा दीड क्विंटललचा हार घालून सुंदर फेटा बांधून फटाक्यांची जोरदार आतिषबाजी करून ढोल ताशांच्या गजरात जंगी स्वागत करण्यात आले. यावेळी लोहा नगरीचे लोकनियुक्त नगराध्यक्ष गजानन सुर्यवंशी, माजी जिल्हा परिषद सदस्य चंद्रसेन पाटील,आंबेडकरी



चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्ते गंगाधरराव महाबळे, माजी नगरसेवक युवराज वाघमारे, , यांच्या सह लोहा -कंधार मधील हजारो ओबीसी बांधव, भीमसैनिक उपस्थित होते. सध्या ओबीसी आरक्षण बचाव चळवळीसहित आगामी विधानसभा निवडणुकीची अनेकजण तयारी करीत आहेत. यात लोहा -कंधार मध्ये एकचपर्व एससी एसटी ओबीसी पर्व चा नारा घुमत आहे. ओबीसींच्या अनेक बैठकी संपन्न होत आहेत. यात आता ओबीसींच्या आरक्षणाच्या संरक्षणासाठी स्वतः वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड प्रकाश आंबेडकर हे मैदानात उतरले असुन त्यांच्या ओबीसी आरक्षण बचाव यात्रेला प्रचंड प्रमाणात प्रतिसाद मिळत आहे. यात लोहा येथे लोकनियुक्त नगराध्यक्ष गजानन सुर्यवंशी यांनी वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड प्रकाश आंबेडकर यांच्या जंगी स्वागताच्या कार्यक्रमासाठी लोहा -कंधार मधील ओबीसी बांधवांनी व भीमसैनिकांनी प्रचंड गर्दी केली होती त्यामुळे लोहा -कंधार मध्ये परिवर्तनाचे वारे वाहत आहेत.

## सावता सेनेच्या वर्धापन दिनानिमित्त महिला जिल्हाध्यक्ष स्वाती कातखडे यांनी वृक्षारोपण करून केला साजरा



पाटोदा (प्रतिनिधी) सावता सेनेच्या बीड जिल्हा महिला अध्यक्षा स्वातीताई कातखडे यांनी निसर्ग वाचविण्यासाठी, संकल्प हा,पर्यावरण संवर्धनचा निसर्गाच्या संरक्षणा साठी. सर्व काही ही वसुंधरा प्रफुल्लित व वृक्षाने सजलेली असावी हाच उद्देश ठेवून आपल्या संघटनेच्या वर्धापन दिना निमित्त वृक्षारोपण करुन सामाजिक बांधिलकी जोपासण्याचा प्रयत्न केला आपल्या संघटनेच्या वर्धापन दिनानिमित्त हार तुरे बँनर बाजी करून उगाच व्यर्थ खर्च करतात परंतु सावता सेनेच्या महिला बीड जिल्हाध्यक्ष स्वाती कातखडे यांनी आपल्या संघटनेच्या वर्धापन दिनानिमित्त वृक्षारोपण करून आदर्श निर्माण केला हीच भूमिका प्रत्येक संघटनेने केली तर हे ओसाड पडलेले डोंगर हे झाडांनी बहरायला वेळ लागणार नाही आणि पर्यावरण हे अतिशय उत्तम राहील वृक्षारोपण प्रसंगी पाटोदा नगरपंचायतचे सभापती रामेश्वर गोरे, दादा नाईकनवरे,दत्ता कातखडे,यांच्या सह महिला पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077